भोर येथील सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, ता. भोर. जि.पुणे यांचे न्यायालयात

नियमित दिवाणी दावा क्र.९४/२०२२

श्री.गणपत राघोबा भिकोले ..... वादी

विरुध्द

श्री विठठल किसन भोंडवे व इतर ..... प्रतिवादी

निशाणी क्र५ वरील आदेश

सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ३९ नियम १ अन्वये तात्पुरती मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

थोडक्यात हकीकतः

२. प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी विरुध्द दावा अतिक्रमण काढुन मिळणेस आणि निरंतर ताकीदीसाठी या करिता दाखल केलेला आहे.

३. तुकडी पुणे पोट तुकडी तालुका भोर, मे. दुययम निबंधक साो, भोर यांचे हददीतील तसेच जिल्हा परिषद पुणे तालुका पंचायत समिती भोर ग्रामपंचायत मौजे ब्राम्हणघर वे. खो. यांच्या अखत्यारीतील, गाव मौजे ब्राम्हणघर वे. खो. येथील

अ. जमीन मिळकत गट नं ३ यांसी क्षेत्र ०हे ३१ आर यांसी आकार ०रु. १३ पैसे यापैकी वादीच्या वडिलोपार्जित मालकी ताबे वहिवाटीचे क्षेत्र ०हे १०.३३ अधिक वादीचे खरेदी मालकीचे क्षेत्र २ आर असे एकुण क्षेत्र १२.३३ आर मिळकत त्यातील ३६ X ३५= १२६० चौ.फुट घर मिळकतसह तसेच मिळकतीत असलेल्या दोन शौचालयासह मिळकत.

ब. गट नं ५ यासी क्षेत्र ०हे १ आर वादीच्या वडिलोपार्जित मालकी ताबे वहिवाटीचे संपुर्ण क्षेत्र हा या दाव्याचा विषय आहे. (सदर मिळकतीचे दाव्याचे परिच्छेद क्रं १ मध्ये चतुःसिमासह वर्णन केलेले आहे. सदर मिळकतीस येथुन पुढे दावा मिळकत असे संबोधित केले जाईल).

४. वादीचे कथन की, सदर दावा मिळकत या वादीच्या वडिलोपार्जित मालकी ताबे वहिवाटीच्या असुन सदर मिळकतींच्या ७/१२ सदरी वादीचे मालक सदरी नोंद आहे. वादीचे वडिल कै. राघोबा आबाजी भिकुले हे कारागिर असुन बांधकाम करत होते. कै.

रंभांजी भोंडवे हे त्यांचे सोबत बिगारी म्हणुन मजुरीने काम करत होते. त्यांना गावी राहण्यास घर नसल्यामुळे वादीचे वडिलांनी रंभाजी भोंडवे यांना गट नं ३ मध्ये असलेल्या ३६ X ३५= १२६० चौ.फुट घर मिळकतीतील पुर्वेकडील ३५ X १०= ३५० चौ.मी जागा राहणेकरिता दिली. तेव्हापासुन रंभाजी भोंडवे व त्यांचे वारस सदर मिळकतीमध्ये राहत आहेत. प्रतिवादी क्रं १ यांनी सदर मिळकतीचे दिलेले क्षेत्र व्यतिरिक्त वादीच्या जागेत १२ X ३५= ४२० चौ.फुट इतके वादीचे घराचे पाठीमागील बाजुने अतिक्रमण केलेले आहे.

५. दि.२८/०५/२०२२ रोजी गट नं ३ मध्ये वादीच्या घराजवळ असलेलया मिळकतीत प्रतिवादी क्रं २ व त्यांचा मुलगा प्रतिवादी क्रं ३ यांनी बेकायदेशीर शिरण्याचा प्रयत्न करुन घराची आखणी करण्याचा प्रयत्न केला. वादी व त्यांच्या मुलाने सदर कृत्यास विरोध करुन गावी तंटामुक्ती अध्यक्ष व सरपंच यांना तक्रार केली. तरी देखील प्रतिवादी यांनी जुमानले नाही. त्यामुळे वादीचा मुलगा सुभाष भिकोले यांनी राजगड पोलीस स्टेशन व पोलीस अधिक्षक पाषाण यांचेकडे तक्रार दिली तरीदेखील प्रतिवादींनी बांधकाम सुरु ठेवल्याने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

६. दि. १२/१२/२०२० रोजी प्रतिवादी क्रं ४ व ५ यांनी वादीचे मालकीचे गट नं ५ या मिळकतीचा ताबा घेण्याच्या उददेशाने मिळकतीत आले व वादीचे वहिवाटीस हरकत केली. वादीने भुमि अभिलेख भोर यांना सदर मिळकतींचे मोजणी करिता अर्ज केला होता. दि.२५/०८/२०२१ रोजी मोजणीचे कामकाज नेमले असता, त्यास प्रतिवादी क्रं २ ते ६ व प्रतिवादी क्रं ७ ते १२ यांनी विरोध करुन सदर काम बंद पाडले. वादीने त्या विरुध्द राजगड पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती. प्रतिवादी क्रं १ ते ६ यांनी प्रतिवादी क्रं ७ ते १२ यांचेशी संगणमत करुन वादीचे संमतीविना गट नं ३ व ५ च्या मिळकतीत घुसखोरी करुन नव्याने रस्ता तयार केलेला आहे. प्रतिवादी वादीस दमदाटी करुन धमकी देत आहेत. त्यामुळे प्रतिवादी विरुध्द मनाईचा हुकुम पारित होणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्रं १३ ते २२ हे या दावा मिळकतीचे सहहिस्सेदार असल्याने त्यांना दाव्यामध्ये पक्षकार केले आहे. त्यांचे विरुध्द वादीस कोणतीही मागणी नाही.

७. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्रं १ ते ६ व ८ ते ११ यांनी नि.क्रं ४७ प्रमाणे म्हणणे

दाखल केले आहे. प्रतिवादी क्रं ७ व १२ यांचे विरुध्द दाव्यास व अर्जास म्हणणे नाही असा आदेश पारित झालेला आहे. प्रतिवादीने वादीची सर्व कथने नाकारली आहेत. प्रतिवादींचे म्हणणे असे की, वादीचा दावा मिळकतीशी संबध नसुन प्रतिवादींना त्रास देण्याच्या हेतुने सदर दावा दाखल केलेला आहे. वादीने २ गुंठे क्षेत्र त्याचे खरेदी असल्याचे नमुद केले आहे. परंतु त्याबाबत खरेदीखताची प्रत अथवा लेखी खुलासा केलेला नाही. वादीने दावा मिळकती वडिलोपार्जित असल्याचे दर्शविण्याकरिता वंशावळ दिलेली नाही. सदर मिळकती या प्रतिवादी क्रं १ ते ३ यांचे ताबे वहिवाटीत आहेत. सदर मिळकतींशी वादीचा कोणताही हितसंबध नसल्याने त्यांना इतरांना सदर मिळकतीमध्ये राहण्यासाठी परवानगी देण्याचा हक्क व अधिकार नाही.

८. प्रतिवादींचे म्हणणे असे की, दावा मिळकत १अ हि मुळची रामचंद्र नाना धुमाळ यांची मालकी वहिवाटीची असुन त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस आज देखील सदर मिळकत वहिवाटत आहेत. त्यांचे नावाची नोंद मिळकतींचे ७/१२ सदरी असल्याने प्रतिवादींना सदर मिळकतीत बांधकाम करण्याचा हक्क आहे. वादीने दावा सोबत दाखल केलेल्या मोजणी पंचनामा पाहता केवळ प्रतिवादी क्रं ३, ६, ७ व ८ यांनी हरकत घेतल्याचे दिसुन येते. परंतु इतर प्रतिवादी यांनी हरकत केलेली नाही. वादीने दोन्ही मिळकती करिता वेगवेगळे दावे दाखल करणे गरजेचे होते. वादीने दाव्यामध्ये आवश्यक पक्षकारांना सामील केलेले नाही. त्यामुळे दावा फेटाळण्यास पात्र आहे.

९. प्रतिवादींचे म्हणणे असे की, स.नं १९/१क यासी क्षेत्र १ एकर ५ आर हि मिळकत रामचंद्र नाना धुमाळ यांचे नाव ७/१२ सदरी नोंदविण्यात आली. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारसांची नोंद सदर मिळकतीचे महसुल दप्तरी नोंद करण्यात आली. दि.२२/१२/१९६४ रोजी त्यांचे वारस चंद्रकांत रामचंद्र धुमाळ व अरुण रामचंद्र धुमाळ तर्फे अ.पा.क आई नामे श्रीमती पार्वती रामचंद्र धुमाळ यांनी सदर मिळकतीपैकी ३ गुंठे जमिन रावसाहेब राघोबा भिकोले यांना खरेदीखताने विक्री केली. त्यानुसार रावसाहेब भिकोले यांचे नावाची नोंद ७/१२ सदरी झालेली आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारसांची नोंद फेरफार क्रं ३२० अन्वये झालेली आहे. सदर खरेदीखत ३ गुंठे क्षेत्राचे असुन त्यापैकी २ गुंठे क्षेत्र रावसाहेब भिकोले यांचे वारस प्रतिवादी क्रं १९ ते २२ यांचे व उर्वरित १ गुंठे क्षेत्र प्रतिवादी क्रं १ यांचे मालकी ताबेवहिवाटीत आहेत. या बाबत उभयंतामध्ये कोणताही वाद नाही. वादी यांचे वडिलांचे

नावाचा ७/१२ कधीही अस्तीत्वात नाही त्यामुळे वादीचे नावाची नोंद ७/१२ सदरी कशाचे आधारे लागले हे वादीने शाबीत करावे. सदर सर्व बांबींचा विचार करुन वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

१०. वादी व प्रतिवादी यांचे अर्ज, सदर अर्जावरील म्हणणे व त्यासोबत दिलेल्या शपथपत्राचे अवलोकन केले. वादी तर्फे विधिज्ञ श्री.एस.के.पांगारे व प्रतिवादींतर्फे विधिज्ञ एस.एस. कुंटे यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

११. वादातील मुद्दे व त्यावरील निष्कर्ष हे त्यापुढे दर्शविल्याप्रमाणे कारणमिमांसेसह नोंदविले आहेत.

अ०क्र०	मुद्दे	निष्कर्ष
१)	वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ?	होकारार्थी
२)	वादी हे सिध्द करतात काय की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे ?	होकारार्थी
३)	वादी हे सिध्द करतात काय की, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे ?	होकारार्थी
४)	काय आदेश ?	अंतिम आदेशाप्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

<u>मुद्दा क्र. १ करिता</u>

१२. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीचे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, दावा मिळकत क्रं अ व ब या वादीच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत. वादीची सदर मिळकतीमध्ये अव्याहत शांततामय वहिवाट आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्रं २ व ३ सदर मिळकतीमध्ये बांधकाम करत आहेत. तसेच प्रतिवादी क्रं १ ते १२ वादीचे वहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत. त्यामुळे वादी प्रतिवादी क्रं १ ते १२ यांचे विरुध्द तात्पुर्ता मनाई हुकुम मिळणेस पात्र आहे. सदर कथनांच्या पुष्ठयर्थ वादीने खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला.

अ. मा. सर्वोच्य न्यायालय यांचे रामेगौडा वारसां तर्फे विरुध्द वरदाप्पा नायडु अपिल सिव्हील ७६६२/१९९७. सदर न्यायनिर्णयामध्ये अव्याहत शांततामय ताबा आहे हे निर्णायिक करण्याकरिताचे मुलभुत घटक नमुद केले आहेत.

ब. मा. सर्वोच्य न्यायालय यांचे शेखअली हुसेन व इतर विरुध्द शेख

शौकतअली व इतर सिव्हील अपिल नं ३६५०/२००८. सदर न्यायनिर्णयामध्ये निरिक्षण नोंदविले की, दावा प्रलंबित असताना मनाई हुकुम पारित केला नाही तर दावा मिळकतीच्या स्वरुपात बदल होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत मनाई हुकुम पारित करणे न्यायोचित आहे.

क. मा. सर्वोच्य न्यायालय यांचे गंगुबाई बबल्या चौधरी विरुध्द सिताराम भालचंद्र सुखटणकर ए.आय.आर १९८३ एस.सी ७४२. सदर न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्य न्यायालय यांनी प्रतिवादी विरुध्द वादीचे दावा मिळकतीतील ताबे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये तसेच एफ.एस.आयचा वापर करु नये असा आदेश पारित केलेला आहे.

ड. मा. सर्वोच्य न्यायालय यांचे वॉल्टर लुईस फ्रॅक्लीन तर्फे वारस विरुध्द जॉर्ज सिंग तर्फे वारस सिव्हील अपिल ४४९/१९८१.सदर न्यायनिर्णयामध्ये वादीचे दावा मिळकतीमध्ये ताबा असल्याने मनाईचा आदेश पारित करण्यात आलेला आहे.

१३. प्रतिवादींचे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, वादीने दावा मिळकत त्याची वडिलोपार्जित मिळकत आहे हे दर्शविण्याकरिता कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. तसेच वादीने त्याचे कथनांचे पुष्ठयर्थ कोणतेही खरेदीखत दाखल केलेले नाही. वादीने महसुल सदरी कोणत्या कागदोपत्रा आधारे त्याचे नावाची नोंद झाली हे देखील प्रथम दर्शनी शाबीत केले नाही. वादीचा दावा मिळकतीशी कोणताही संबध नाही. त्यामुळे वादी तात्पुर्ता मनाई आदेश मिळण्यास पात्र नाही. सदर कथनांचे पुष्ठयर्थ प्रतिवादींचे विधिज्ञांनी खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला.

अ. मा.सर्वोच्य न्यायालय यांचे मंगामल उर्फ थुलसी व इतर विरुध्द टी.बी. राजु वगैरे, सिव्हील अपिल नं १९३३/२००९. सदर न्यायनिर्णयामध्ये खालील प्रमाणे निरिक्षण नोंदविले आहे.

' ***Any property inherited up to four generations of male line age from the father, father's father, or father's father's, grand father etc. termed as ancestral property.***'

ब. मा. आंध्र प्रदेश उच्च न्यायालय यांचे डी सुगुणा विरुध्द श्री बालाजी व्यंकटेश्वर स्वामी, २००४ (३) ए.एल.डी ८०२. सदर न्यायनिर्णयामध्ये असे

निरिक्षण नोंदविले की, बेकायदेशीर ताबा तात्पुर्ता मनाई हुकुम पारित करुन संरक्षित करता येणार नाही.

क. मा. पंजाब व हरियाना उच्च न्यायालय यांचे बच्चनसिंग विरुध्द साधुसिंग वगैरे ए.आय आर २००४ पी.एच ६५.सदर न्यायनिर्णयामध्ये निरिक्षण नोंदविले की, दावा मिळकतीचे मुळ मालकाविरुध्द त्रयस्थ इसमा करिता मनाईचा आदेश पारित करता येणार नाही.

ड.) मा आंध्र प्रदेश उच्च न्यायालय यांचे एस.प्रभावती विरुध्द रोहिणी किलारु व इतर २००६ (५) ए.एल.डी ६०६. सदर न्यायानिर्णयामध्ये निरिक्षण नोंदविले की, वादीस प्रथमदर्शनी केस नाही, त्यामुळे वादी मनाईचा हुकुम मिळणेस पात्र नाही.

१४. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच उपरोक्त नमुद न्यायनिर्णयाचे काळजीपुर्वक अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणातील वादकथने ध्यानात घेता अभिलेखावर दाखल कागदपत्रे ध्यानात घेणे जरुरीचे आहे. वादीने प्रतिवादी क्रं २ व ३ यांनी गट नं ३ या मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम करु नये व वादीचे ताबे वहिवाटीस हरकत करु नये अशी मागणी केली आहे. वादीने दाखल केलेल्या गट नं ३ चे ७/१२ उतारावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादी क्रं २ अरुण रामचंद्र धुमाळ हे गट नं ३ चे भोगवटदार आहेत. तसेच प्रतिवादी क्रं ३ हे प्रतिवादी क्रं २ यांचा मुलगा आहे. त्यामुळे सदर ७/१२ उतारावरुन असे दिसुन येते की, वादी व प्रतिवादी क्रं २ हे गट नं ३ चे सहहिस्सेदार आहेत. तसेच सदर वादी व प्रतिवादी यांचे सामाईक क्षेत्र आहे. अशा परिस्थितीत वादीने प्रतिवादी वादीचे ताब्यात असलेल्या मिळकतीवर अतिक्रमण करत आहेत हे शाबीत करण्याकरिता वादीचे ताब्यामध्ये नेमके कोणते क्षेत्र आहे याबाबत स्पष्टीकरण करणे जरुरीचे आहे. वादीचे वादकथने व दाखल कागदपत्रे यावरुन असे दिसुन येते की, वादीने सदर मिळकतीचे मोजणीकरिता अर्ज दिलेला होता परंतु प्रतिवादी क्रं ३,६,७ व ८ यांनी सदर मोजणीस हरकत घेतलेली आहे. सदर मोजणी पंचनामा नि.क्रं ३ सोबत दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये अदयाप सदर मिळकतीची मोजणी झालेली नाही असे दिसुन येते. तसेच वादी व प्रतिवादी क्रं २ यांचे सदर मिळकतीमध्ये सामाईक क्षेत्र असल्याने त्यांचे वाटप झालेले नाही हे देखील दिसुन येते.

१५. वादीचे म्हणणे असे की, प्रतिवादी क्रं २ व ३ हे गट नं ३ या मिळकतीमध्ये बेकायदेशीरपणे घुसुन घराची आखणी करण्याचा प्रयत्न करत आहेत. वादीने सदर बाब शाबीत करण्याकरिता दावा मिळकतीचे छायाचित्र दाखल केलेले आहे. सदर छायाचित्रावरुन असे दिसुन येते की, सदर मिळकतीवर बांधकाम चालु आहे. त्यामुळे सदर वादीची कथने व दाखल कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, दावा दाखल करतेवेळी वादीचा सदर क्षेत्रावर ताबा नाही. तसेच प्रतिवादी सदर मिळकतीचे सहहिस्सेदार आहेत. सदर मिळकतीमध्ये प्रतिवादींचा देखील हिस्सा आहे. या ठिकाणी हे नुमद करणे जरुरीचे की, कायदेचे तत्वानुसार सहहिस्सेदाराचा मिळकतीचे प्रत्येक भागावर समान हिस्सा असतो. परंतु सदर अर्ज निर्णायक करण्यासाठी दावा मिळकतीमधील क्षेत्रावर प्रत्यक्ष ताबा कोणाचा आहे हे निर्णायक होणे जरुरीचे आहे.

१६. वादीचे म्हणणे असे की, गट नं ३ मिळकत वादीची वडिलोपार्जित मिळकत असुन त्यामध्ये २ गुंठे क्षेत्र हे खरेदीचे आहे. प्रतिवादीचे म्हणणे असे की, वादीचा भाउ रावसाहेब राघोबा भिकोले यांनी चंद्रकांत रामचंद्र धुमाळ व अरुण रामचंद्र धुमाळ तर्फे अपाक आई म्हणुन पार्वतीबाई रामचंद्र धुमाळ यांचेकडुन स.नं १९/१क यासी क्षेत्र १ एकर ५ आर पैकी ३ आर जमिन रावसाहेब राघोबा भिकोले यांना नोंदणीकृत खरेदीखताव्दारे दिलेली आहे. प्रतिवादीने सदर खरेदीखत खरेदी खत दाखल केले आहे. एकत्रीकरण योजनेमध्ये स.नं १९ चे १० हिस्से पडुन प्रतिवादी यांचे मालकी क्षेत्रास हिस्सा नं ३ देण्यात आला व त्यास गट नं ३ देण्यात आलेला आहे. प्रतिवादीने त्या संदर्भात फेरफार नं ५०१ व एकत्रीकरण योजनेचा उतारा दाखल केलेला आहे. प्रतिवादीने न्यायालयाचे लक्ष महसुल कागदोपत्रांकडे वेधले. वादीने दाखल केलेल्या ७/१२ चे अवलोकन केले असता, गट नं ३ चे ७/१२ उतारास वादीची फेरफार नं ११३ प्रमाणे नोंद झालेली आहे. प्रतिवादीने फेरफार नं ११३ ची प्रत दाखल केलेली आहे. सदर फेरफार नंबर मध्ये वादीचे नावाचा उल्लेख नाही. त्यामुळे सदर ७/१२ उतारास वादीचे नावाची नोंद कोणत्या कागदोपत्रा आधारे झाली हे स्पष्ट होत नाही. असे असले तरी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियमचे कलम १५७ प्रमाणे सदर नोंदी विसंगती सिध्द होईपर्यंत अचुक असल्याचे गृहित धरता येईल. परंतु प्रतिवादीने नमुद केल्याप्रमाणे सदर नोंदीमध्ये प्रथमदर्शनी दोष असल्याचे देखील आढळुन येते.

१७. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी व प्रतिवादी गट नं ३ चे सहहिस्सेदार आहेत. वादीने प्रतिवादींनी अतिक्रमण केलेले आहे हे दर्शविण्याकरिता केवळ दाव्यासोबत नकाशा दाखल केलेला आहे. परंतु त्यामध्ये वादीचे ताब्यातील क्षेत्र तसेच प्रतिवादीने किती क्षेत्रामध्ये अतिक्रमण केलेले आहे याबाबत दर्शविले नाही. तसेच वादी व प्रतिवादी यांचे सामाईक क्षेत्र आहे. वादी व प्रतिवादी यांचे मालकीचे क्षेत्राच्या हददी निश्चित आहेत व प्रतिवादींनी वादीचे हददीत अतिक्रमण केलेले आहे हे शाबीत करणे वादीची जबाबदारी आहे. परंतु वादीने या संदर्भात कोणतेही कागदपत्रे दाखल केलेले नाही. केवळ दाव्यासोबत जोडलेल्या हस्तनकाशावरुन प्रतिवादीने अतिक्रमण करुन बांधकाम केले आहे असा निष्कर्ष काढणे उचित होणार नाही. महत्वाची बाब म्हणजे वादीने प्रतिवादी बांधकाम करत असलेली मिळकत त्याचे प्रत्यक्ष ताब्यामध्ये होती हे दर्शविण्याकरिता कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्रं २ व ३ त्याचे ताब्यामध्ये असलेल्या मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम करत आहेत हि बाब प्रथमदर्शनी शाबीत केलेली नाही.

१८. वादीने प्रतिवादी क्रं ४ व ५ यांनी गट नं ५ या मिळकतीमध्ये बेकायदेशीर अतिक्रमण करुन नव्याने फेरबदल करु नये तसेच प्रतिवादी क्रं ६ ते १२ यांनी प्रतिवादी क्रं १ ते ५ यांचेशी संगणमत करुन गट नं ३ व गट नं ५ या मिळकती बेकायदेशीर अतिक्रमण करुन फेरबदल करु नये व वादीचे वहिवाटीस हकरत करु नये अशी मागणी केलेली आहे. वादीने गट नं ५ या मिळकतीचा दाखल केलेल्या ७/१२ उतारावरुन असे निष्पन्न होते की, वादी सदर मिळकतीचे भोगवटदार आहेत. प्रतिवादीचे म्हणणे असे की, वादीची सदर ७/१२ वरील नोंद चुकीची आहे. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र महसुल अधिनियमचे कलम १५७ प्रमाणे जोपर्यंत विसंगती सिध्द होत नाही तोपर्यंत महसुल अभिलेखावरील नोंदी अचुक असल्याचे गृहित धरले जाईल. त्यामुळे सदर ७/१२ उतारावरुन वादी गट नं ५ चे भोगवटदार असल्याचे दिसुन येते. अभिलेखावर दाखल मोजणी पंचनामा ध्यानात घेता प्रतिवादी क्रं ३, ६ ७ व ८ यांनी गट नं ३ व ५ चे मोजणीस हरकत केल्याचे दिसुन येते. त्याबाबत वादीने पोलीस निरिक्षक राजगड पोलीस स्टेशन व पोलीस अधिक्षक चव्हाण नगर पाषाण पुणे यांना तक्रारी अर्ज केल्याचे दिसुन येते. सदर अर्ज अभिलेखावर दाखल आहेत. या ठिकाणी हे नमुद करणे जरुरीचे की, ७/१२ उतारा मालकीचा पुरावा नसला तरी वादीचा ताबा शाबीत करण्याकरिता प्रथमदर्शनी पुरावा म्हणुन ग्राहय धरला जातो. त्यामुळे वादीचे

कथने दाखल कागदपत्रे यावरुन वादीचा गट नं ५ मधील ताबा आहे असे दिसुन येते. प्रतिवादींनी नि.क्रं ४७ प्रमाणे प्रस्तुत अर्जास दिलेल्या जबाबामध्ये वादीचा सदर मिळकतींशी संबध नाही असे कथन केले आहे. ज्याअर्थी प्रतिवादी सदर मिळकतीतील वादीची वहिवाट व मालकी नाकारत आहे त्याअर्थी प्रतिवादी वादीचे गट नं ५ मधील हक्कास हरकत अडथळा करत आहेत असा निष्कर्ष काढण्यात येतो.

१९. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी व प्रतिवादी क्रं २ हे गट नं ३ या मिळकतीचे सहहिस्सेदार आहेत. सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी क्रं २ यांचे बांधकाम चालु आहे. वादीने गट नं ५ हि मिळकत त्याचे ताब्यात असल्याचे व प्रतिवादी त्याचे ताब्यास हरकत करत असल्याचे प्रथम दर्शनी शाबीत केलेले आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांचेमध्ये दावा मिळकतीवरुन वाद असल्याचे दिसुन येते. सदर वाद दावा गुणदोषावर चालवुन निर्णायक करणे जरुरीचे आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीस प्रतिवादींविरुध्द प्रथमदर्शनी केस आहे. म्हणुन मुददा क्रं १ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुददा क्रं २ व ३ करिता</u>.

२०. प्रस्तुत प्रकरणामध्ये उपरोक्त चर्चिलेप्रमाणे वादी व प्रतिवादी क्रं २ हे गट नं ३ या मिळकतीमध्ये सह हिस्सेदार आहेत. सदर मिळकतीचे क्षेत्र त्यांचेमध्ये सामाईक आहे. वादीचे कथनांवरुन सदर मिळकतीमध्ये वादीची देखील घर मिळकत देखील आहे.त्यामुळे वादी प्रतिवादीस सदर मिळकतीमध्ये बांधकाम करण्यास हरकत घेउ शकत नाही. प्रतिवादीचे म्हणणे असे की, प्रतिवादी त्यांचे मालकी व ताबे वहिवाटीचे क्षेत्रात बांधकाम करत आहेत. वादीने प्रतिवादी त्याचे ताब्यातील क्षेत्रामध्ये बांधकाम करत आहे हे प्रथमदर्शनी शाबीत केलले नाही. अशा परिस्थितीत मनाई आदेश पारित न केल्यास वादीचे कोणतेही नुकसान अथवा गैरसोय होणार नाही. याउलट प्रतिवादी सदर मिळकतीचा भोगवटदार आहे. तसेच प्रतिवादीने अतिक्रमण केलेले आहे असे दिसुन येत नाही. अशा परिस्थितीत मनाई आदेश पारित केल्यास निश्चितच प्रतिवादी क्रं २ यांची गैरसोय होणार आहे.

२१. अभिलेखावरील दाखल कागदपत्रावरुन वादी गट नं ५ या मिळकतीचा भोगवटदार असल्याचे दिसुन येते. तसेच प्रतिवादी क्रं १ ते १२ वादीचे सदर मिळकतीतील हक्क

नाकारुन त्यास हरकत निर्माण करत असल्याचे आढळते. अशा परिस्थितीत मनाई आदेश पारित न केल्यास निश्चितच वादीची गैरसोय होउन वादीचे नुकसान होणार आहे. अभिलेखावरील दाखल कागदपत्रावरुन प्रतिवादी क्रं १ त १२ यांचा सदर गट नं ५ शी कोणताही संबध नसल्याचे आढळुन येते. अशा परिस्थितीत मनाई आदेश पारित केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. अशा परिस्थितीत सर्व बाबी ध्यानात घेता मुददेमा क्रं मुददा क्रं २ व ३ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवत आहे.

<u>मुददा क्रं ४ करिता</u>

२२. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीने त्यास दावा मिळकत क्रं १ब म्हणजे गट नं ५ या मिळक्ती संदर्भात प्रथमदर्शनी केस असुन मनाईचा आदेश पारित न केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार असुन वादीची गैरसोय होणार आहे ही बाब शाबीत केलेली आहे. अशा परिस्थितीत वादी गट नं ५ या मिळकती बाबत तात्पुर्ता मनाई आदेश मिळणेस पात्र आहे. परंतु उपरोक्त नमुद कारणमिमांसा ध्यानात घेता दावा मिळकत क्रं १ अ म्हणजे गट नं ३ या मिळकतीबाबत प्रतिवादी क्रं.२ व ३ यांचे विरुध्द तात्पुर्ता मनाई आदेश पारित करणे न्यायोचित होणार नाही. वरील सर्व परिस्तिथी व बाबी, तसेच मुद्दयांवरील निष्कर्ष व त्यावरील कारणमिमांसा व दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ मधील तरतुदी ध्यानात घेता प्रस्तुतचा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. त्याप्रमाणे मुद्दा क्र.४ च्या उत्तरार्थी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१	वादीचा अर्ज नि.क्रं ५ अंशतः मंजूर करण्यात आला.
२	प्रतिवादी क्रं १ ते १२ यांनी दावा प्रलंबित असताना दावा मिळकत १ब म्हणजे मौजे ब्राम्हणघर ता.भोर जि. पुणे येथील गट नं ५ या मिळकतीमधील वादीचे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये. तसेच सदर मिळकतीमध्ये कोणतेही फेरबदल करु नये, असा दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ३९ प्रमाणे तात्पुरता मनाईचा आदेश पारित करण्यात आला.
३.	सदर दाव्यात पुर्वी केलेला जेसे थे चा आदेश निष्क्रीय करण्यात येतो.

HARSHADA UTTAM PATIL Digitally signed by HARSHADA UTTAM PATIL Date: 2023.03.20 17:28:25 +0530

(खुल्या न्यायालयात अधिघोषित)
दि.१७/०३/२०२३

(ह.उ.उ.पाटील)
सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर भोर,
जि.पुणे

Certificate

I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order.

Name of the Steno : V.G.Fulari

Court Name : Smt. H.U.U. Patil.

J.M.F.C., Bhor, Dist. Pune.

Date :17/03/2023

Judgment signed by presiding officer on : 20/03/2023

Judgment uploaded on : 20/03/2023.”